International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.082
Vol.3 No.4 Mar – Apr 2016

# वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चाः कथन आणि भाषाशैली

**प्रा. सागर अशोक लटके**
कन्या महाविद्याल, मिरज

**प्रास्ताविक:**

आजची मराठी कथा अनेक अंगानी विस्तारत आहे. जयंत पवार, समर खडस, आसाराम लोमटे, किरण गुरव, मनस्विनी लता रवींद्र, नीरजा या लेखकांनी मराठी कथेला एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. सर्वसामान्य माणसाचं जगणं केंद्रवर्ती ठेवत, त्याच्या जगण्यातील विविध परिमीतीचे अनेकपदरी दर्शन त्यांनी घडवले आहे. या लेखकांनी कथेविषयीच्या पूर्वसमजुतींना ओलांडत नवी जाण प्रस्तुत केली आहे. त्यांचे कथालेखन दीर्घत्वाकडे झुकणारे आहे. एकापेक्षा अधिक पात्रे केंद्रस्थानी ठेवत वेगवेगळे आवाज पृष्ठस्तरावर आणणे त्यांना शक्य झाले आहे. नेमाडे यांची कथेविषयीची विधाने सकारात्मक अर्थाने आजच्या मराठी कथेला बळ पुरवणारी ठरली आहेत. चिंचोळा, एकसुरी, गौण वाङ्मयप्रकार म्हणून स्थिरावलेल्या या वाङ्मयप्रकारात नजिकच्या काळात मोठे बदल झाले. लेखक बहुविध आशयसूत्रे, त्यातील अंतर्विरोध नेमकेपणाने मांडत कथालेखनाचे एक नवे रचित साकारत आहेत. विस्तारित अवकाश त्यांच्या कथेत आहे. कथालेखनाचा पारंपरिक ढाचा त्यांनी लवचिक केला आहे. प्राचीन मराठी

गद्य तसेच मौखिक लोककथांचा प्रभाव त्यांच्या कथांवर आहे. देशी कथनपरंपरेकडे त्यांचा असलेला कलही स्पष्टपणे जाणवतो. वरवरचे पृष्ठस्तरीय वास्तव मांडण्यापेक्षा खोलवरचे गर्भित सूचन करण्याकडे त्यांचा कल आहे. धर्म, जात, लिंग, प्रदेश अशा अस्मिताकेंद्री गोष्टींची दाट छाया पसरलेल्या काळाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करण्याचे काम या लेखकांनी केले आहे. शोषित, वंचित, कष्टकरी वर्ग त्यांच्या साहित्यातून सातत्याने अवतीर्ण झाला आहे. तसेच या जगाशी त्यांचे आंतरिक नाते आहे. जयंत पवार यांच्या कथासंग्रहाचा विचार करत असताना पार्श्वभूमीदाखल आजच्या कथेसंदर्भातील काही निरीक्षणे नोंदवणे महत्वाचे वाटले. याबरोबरच एक लेखक म्हणून जयंत पवार यांच्या जीवनविषयक वाटचालीचा आढावा घेणे प्रस्तुत शोधनिबंधात गरजेचे वाटते.

**कथनातील प्रयोगशीलता व फँटसीचा वापर**

जयंत पवार यांच्या कथा कथनाच्या अनुषंगाने वैशिष्टयपूर्ण आहेत. पाचही कथांमध्ये याचा प्रत्यय येतो. त्यांच्या कथनाचा महत्त्वाचा विशेष म्हणजे वाचकांना त्यांनी चर्चेच्या अथवा कथनाच्या कक्षेत सतत आणले आहे. कथा वाचत असताना वाचकांची उपस्थिती सतत जाणवत राहते. कथनाच्या अनुषंगाने लक्षणीय विविधता जयंत पवार यांच्या कथेत आहे. वास्तव आणि कल्पिताचा खेळ उभा करत संबंध कथनव्यवहार त्यांनी साकारला आहे. पृष्ठस्तरीय अनुभवद्रव्याचे अनेक कंगोरे उजागर करण्यासाठी ही शैली फायदेशीर ठरली आहे. 'बाबलच्या आयुष्यातील धादांत सत्य' या पहिल्या कथेमध्ये लेखकास बाबलचे मिथक

तयार करायचे आहे. त्यासाठी मूळ कथेला समांतर अशी कल्पितकथा उभी केली आहे. अद्‌भुततेचा विलक्षण वापर या कथेत असला तरी त्यात वास्तवाचा अंश इतका गडद आहे की, अद्‌भुतताही खरी वाटायला लागते. बाबलचे मिथक तयार करण्यासाठी या पायाभरणीची लेखकास आवश्यकता वाटते. तसेच कथनाची ही सर्व क्रिया वाचकांना विश्वासात घेऊन पुढे सरकते. भूत-वर्तमान अशी काळाची सरमिसळ असतानाही कथानकाचा ढाचा कुठेही बिघडत नाही. या कथनशैलीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे संवादविरहितता. या कथेत प्रत्यक्ष असा एकही संवाद नाही. संपूर्ण कथा कथनकर्त्याच्या सांगण्यातून आकाराला आली आहे. प्रत्यक्ष लिहता लेखक कथन करत असल्याचा कथनात्मक पवित्रा आहे. त्यामुळे कथनकर्त्याच्या सांगण्याला बळकटी प्राप्त झाली आहे. कथाबाह्य कथनकर्ता हे जग आपल्याला इतक्या जवळून दाखवतो की, त्यातील खरेपणाविषयी कोणतीही साशंकता आपल्या मनात राहत नाही.

'बरनभातलोन्चा नि को नाय कोन्चा' या कथेमध्ये प्रमुख पात्र असणाऱ्या 'बय' आणि 'डिम्याची' रूढ पद्धतीने गोष्ट न सांगता, त्यांचा पाठलाग करत जे दिसते ते दाखवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे गोष्ट वर्तमानात घडत असल्यासाराखी वाटते. त्यातील घटनाक्रम, सहजता अपूर्व अशीच आहे. या दाखवत अखसलेल्या जगाशी खकाचे दृढ असे नाते आहे. त्यात कुठेही कल्पितता असल्याचा संशय मनात येत नाही. तसेच पशीलबहूल शैलीमुळे भोवतालचा अवकाश सजीवपणे रेखाटता आला आहे. जे सांगत आहे त्याविषयाची पूरक माहिती या तपशीलांमधून मिळते. आशयास उठाव देण्यासाठीही हे तपशील सहाय्यभूत

ठरतात अशा तपशीलप्रधानतेमुळे त्यांच्या कथा काहीशा दीर्घ होत जातात. मात्र या दीर्घतेमुळे त्यांना भोवतालची समग्रता कवेत घेता आली आहे.

या कथेमध्येही जयंत पवार यांनी कल्पिताचा वापर केला आहे. डिग्याची त्याच्या मृत्यू पावलेल्या बडिलांशी नामदेवशी भेट घडवत अनेक गोष्टी साधला आहेत. डिग्याचा संवेदनस्वभावच या घटनेनंतर पालटतो. नामदेव त्यास आपली करूण कहाणी सांगतो व गुन्हेगारी विश्वापासून राहण्यास सांगतो. भविष्यातील सावधानतेबाबत इशारा देतो. "बबड्या साबध न्हा. सगळं बी नाद सोड.शांत्याचा बी नाद सोड. सगळयांचे हिशोब होतात एक दिवस. (पृ. 90) कोणी कोणाचे नसल्याचे तत्त्व तो डिग्याला सांगतो. फक्त म्हातारीला बटाला सांभाळण्यास सांगतो. भविष्यातील वाटचालीविषयी तो डिग्याला काहीएक सूचन करतो. नामदेवचे कथासंहितेत प्रवेश करणे हे कथाशयाला अर्थपूर्ण ठरले आहे.

या कथेमध्ये कथनकर्ता हा कथाबाह्य आहे. तो बाहेरून सर्व गोष्टी कथन करतो. गोष्ट सांगत असताना तो वाचकांना त्यात सामावून घेतो. उदा. मला या बय आणि डिग्याची गोष्ट सांगायची आहे. चुकलो सांगायची नाही, मला या दोघांना फॉलो करायचंय (59) बाबी मुळिक तिचा शेजारी. त्याच्याविषयी थोड सांगितलंच पाहिजे (पृ. 65) 'शिरी उर्फ श्रीकांत हा बयचा भाचा हे मागे सांगितलेच आहे. (पृ. 66) असे गृहित वाचकांना सतत कथनक्रियेत सामावून घेतले आहे. ही गोष्ट आपण वाचकांना सांगतो आहोत असा कथनात्मक पवित्रा आहे. याचा प्रत्यय त्यांच्या सर्वच कथांमध्ये कमी-अधिक प्रमाणात येतो.

जयंत पवार यांच्या बहुतांश कथेचा प्रारंभ मूळ कथावस्तुंशी निगडीत असणाऱ्या भोवतालच्या दिग्दर्शनाने होतो. पुढील कथानकाचा डोलारा प्रारंभी येणाऱ्या या अवकाश

दिग्दर्शनावर आहे. पुढील कथेचे सूचन त्यात आहे. 'तुझीच सेवा करू काय जाणे' या कथेतील निवेदक सुरुवातीला लालबागच्या भोवतालचे आणि गणेशभक्तीने भारलेल्या वातावरणाचे दिग्दर्शन करतो. त्यानंतर अनामिक ज्वराने घेरलेल्या चिंट्यास नारायण पालकर तथा तात्या गोष्ट सांगताहेत असा कथनात्मक पवित्रा घेतला आहे. पुढे तात्या गोष्ट सांगताहेत असा कथनात्मक पवित्रा घेतला आहे. पुढे निवेदक कथनाची सूत्रे तात्या पालकरकडे सोपवतो. गोष्ट सांगणारा तात्या पालकर विषयवस्तुशी संबंधित आहे. कथेचा नायक असणारा बाळा मेस्त्री व त्याच्या संपूर्ण कुटुंबाशी त्याचे दृढ असे नाते आहे अतिशय प्रांजळपणे घडलेला सर्व इतिहास तो सांगतो. घडलेल्या गोष्टी अतिशय जवळून दाखवतो. त्यात आत्मीयता आहे. नायकाच्या वडिलांपासून ते त्याच्या नातवापर्यंतचा काळाचा दीर्घपट अतिशय समरसून सांगतो. भूतकाळातील घटनांवर चढलेले धुळीचे पुट्टे बाजूला करतो. नायकाची कथा सांगत असताना कालपरत्वे झालेली स्थित्यंतरे व त्यासंदर्भातील इत्थंभूत तपशील देतो. तसेच कथाबाह्य कथनकर्त्याच्या सततच्या उपस्थितीमुळे तात्या पालकरच्या घरची कहाणीही येते. एकंदर वास्तव कल्पिताचा अनोखा खेळ उभा करणारी जयंत पवार यांची कथनशैली नेमक्या विधानापर्यंत पोहचते.

**लेखकाचे भाषाभान**

जयंत पवार यांच्या कथेची भाषा चिंतनशीलतेकडे, वैचारिकतेकडे झुकणारी आहे. मौखिक परंपरेतील गोष्टीपासून ते जागतिक स्तरावरील साहित्य अभ्यासाचा त्यांच्या भाषेवर गडद असा ठसा आहे. त्यामुळे कथाशयाला परिणामकारकरित्या आविष्कृत करणारी भाषा त्यांनी उपयोजली आहे. त्यांच्या कथांमध्ये प्रत्यक्ष संवादापेक्षा वर्णनपरता

अधिक आहे. अर्थात त्यांच्या कथांमध्ये घडलेल्या गोष्टींची फक्त वर्णने येत नाहीत, तर त्यावरील चिंतनभाष्येही येतात. 'सर निघाले सप्तपाताळाकडे' या कथेत देशोदेशीच्या अनेक साहित्यकृतीचे व चित्रपटाचे संदर्भ येतात. लुई पिरांदेल्लो यांचे "सिक्स कॅरेक्टर्स इन सर्च ऑफ अॅन ऑथर' हे नाटक. या नाटकातील पात्रांची तडफड न पोहचलेल्या पत्रांसारखीच असल्याचे म्हटले आहे. मार्खेजच्या "क्रॉनिकल ऑफ अ डेथ फोरटोल्ड' या कादंबरीतील एंजलो व्हिकारिओ सतरा वर्षे नवऱ्याला पत्रे पाठवते. 'पोस्टमन इन द माऊंटन' या कथेतील पोस्टमन बापाला पाठंगुळी मारून नेणारा मुलगा. एका कथेत आलेले हे सर्व लेखकाच्या जाणीवेचा परीघ किती विस्तारशील आहे याची साक्ष देतात. तसेच त्यांचे संवेदनविश्व कोणत्या जगताशी संबंधित आहे हेही समजते. वर्ण्यविषयाशी त्यांना असलेली आस्थाही यातून दृगोचित होते. याचा प्रत्यय भाषिक पातळीवरही येतो. कमालीच्या आत्मीयतेने ते या घटनाप्रसंगाचे कथन करतात. ते सर्व त्यांच्या भाषेतही पहायला मिळते.

जयंत पवार यांच्या या संग्रहातील कथांचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांनी कथांची विभागणी काही भागात केली आहे. सुरुवातीच्या "बाबलच्या आयुष्यातील धादांत सत्य' आणि "सर निघाले सप्तपाताळाकडे' या कथांमध्ये दोन समांतर कथानके आहेत. पहिल्या कथेमध्ये त्यांनी कल्पितसूत्र तिरक्या फॉन्टमध्ये दिले आहे. तर दुसऱ्या कथेतील पत्रांसाठी तशाच फॉन्टचा वापर केला आहे. वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी आणि सांगत असलेला कथाशय ठसवण्यासाठी हा बदल उपयुक्त ठरतो. पुढच्या तीन कथांना त्यांनी उपशीर्षके दिली आहेत. तसेच त्या सूत्रांचा विस्तार करत आवश्यक ते तपशील पुरवले आहेत. बारक्या-सारक्या नोंदीमुळे त्यास एक भरीवपणही आले आहे. भूत-वर्तमान असा

प्रवास अधोरेखित करता आला आहे. हा कथनात्मक पवित्रा आणि गृहित वाचकांची उपस्थिती यामुळे कथाशयास उठाव मिळाला आहे.

पवार यांच्या कथांमधून काव्यात्मकतेचाही प्रत्यय येतो. त्यांच्या कथांची शीर्षकेई काव्यात्मकतेकडे झुकणारी आहेत. "सर निघाले सप्तपाताळाकडे', "तर्काच्या खुंटीवरून निसटलेले रहस्य', "तुझीच सेवा करू काय जाणे' अशी शीर्षके गुढता वाढवणारी आणि विचारप्रवृत्त करणारी आहेत. अर्थवत्ता वाढवणारी आहेत. 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' या कथेमधील उपशीर्षकेही काव्यात्मकतेचा अनोखा प्रत्यय देतात. 'ऐका रे डोळयांनो, बघा रे कानांनो...', "बदलवणाऱ्याचा पतंग दिसतो, काटणाऱ्याचा मांजा दिसत नाही.' "जिसका चलता है उसका हिलता है', "काळ तर मोठा कठीण आला, तुरूप साला हटिन आला' अशी उपशीर्षकांची शृंखलाच जयंत पवार यांच्या कथेत आहेत. त्यातून तरल अशी काव्यात्मकता प्रकटली आहे. अशा रचनेमुळे त्या प्रसंगाची नेमकी नस पकडली गेली आहे. त्यात एकप्रकारची सूचकता आहे. आता हटिन म्हणजे हुकमाचे पान. या कथेमध्ये हटिन म्हणून बयचा मोठा मुलगा महादेव प्रवेश करतो. त्यामुळे या शीर्षकांकडे प्रतीकात्मकतेनेही पहावे लागते. संबंध कथासंग्रहामध्ये अशी काव्यात्मकतेकडे झुकणारी वाक्यरचना आपल्याला पहायला मिळते. ङ्गङ्गजयंत पवार यांच्या कथेची भाषा ही नागर जीवनानुभूतीचा प्रत्यय देणारी आहे. ती अधिकतर प्रमाणभाषेशी सुसंगत आहे. काही प्रमाणात बोलण्याच्या रूपात येणाऱ्या विशेषणांचा, क्रियापदांचा वापर आहे. त्यांच्या शैलीचे नाते मात्र प्राचीन मराठी गद्यशैलीशी आहे. मौखिक परंपरेतील गोष्टीरूप कथनशैली व आखूड वाक्यरचना हे त्याचेच द्योतक आहे. 'सर निघाले सप्तपाताळाकडे' या कथेतील अंश

या अनुषंगाने पाहता येईल. या पत्रापत्रीतील हूरहूर महत्त्वाची. काळजातील धडपड महत्त्वाची. आताची पोरं मोबाईलवर एसेमेस पाठवतात. तो चटकन पोचतो. चटकन पुसूनही टाकता येतो. इंटरनेटवर कधीही मेल येऊन धडकू शकते. तिला जबाबही पटकन. पण ज्या गोष्टी चटकन होतात. त्यांचं अप्रूप राहत नाही. (पृ. 43) या छोट्याशा अवकाशातून पत्र आणि इतर संवादमाध्यमातील तफावत नेमकेपणाने सांगितली आहे. पत्रांमधून प्रकटणारा जीवंतपणा, रसरशीतपणा व थेटपणा त्यांना त्यांना महत्त्वाचा वाटतो. नफेखोरी तत्त्वाने अस्तित्वात आलेल्या संवादमाध्यमांचा त्यांना तिटकारा आहे. हे सर्व आखूड वाक्यबंधातून लेखकाने समर्पकरित्या साकारले आहे. त्यामुळे त्यांच्या कथांना दृश्यात्मकताही प्राप्त झाली आहे. अशा दृकशैलीमुळे त्यांच्या कथा वाचनीय झाल्या आहेत. सतत पात्रांच्या मागे कॅमेरा असल्यामुळे त्यांची गोष्ट चलत चित्रपटासारखी दिसते. हा त्यांच्या कथेचा महत्त्वाचा विशेष आहे.

एकंदरीत जयंत पवार यांची कथा समकाळाची महत्त्वाची उपलब्धी आहे. महानगरातल्या शोषित-वंचितांच्या जगण्याचा तळठाव ती घेते. शोषणाच्या शृंखलाबद्ध कहाण्या व संघर्षाच ती सांगते. इतिहासाचे पुनर्वाचन करत मिथकांचे, पुराणांचे नव्याने अर्थनिर्णयन करते. रूजवू पाहते. रूपबंधाच्या पातळीवरही ही कथा लक्षवेधक आहे. वास्तव आणि सांधनीतून कथाशयाला ठाशीव आकार दिला आहे. कथनशैली आणि भाषेचाही लवचिकतेने वापर करत कथा लिखानाचे एक नवे प्रारूप उभे केले आहे.

**संदर्भ:**


1. पवार जयंत- "वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा" - लोकवाडमयगृह प्रकाशन, मुंबई, जानेवारी 2015
2. थोरात हरिश्चंद्र - "कादंबरीविषयी"- पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. 2011
3. शिंदे रणधीर - "हा ॠतू वेगळा आहे", प्रतिष्ठान, जून - ऑगस्ट, 2015
4. पांढरे रवींद्र - "अस्वस्थ करूणेचा माग" - दिव्य मराठी, सप्टेंबर, 2015